**प्रेस नोट** दि.१४/०७/२०१९

**वेश्या व्यवसायातून गरीब घरातील मुलीची सुटका**

दि.१२/०७/२०१९ रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे पो.हवा.१७८१ दिनेश शिंदे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वेश्या व्यवसायातील एजंट नामे - (१) समीरा, (२) हैदर खान, (३) करण, (४) अमर व (५) अजय हे वेगवेगळ्या हॉटेल/लॉजमध्ये मुली ठेवून स्वतः तसेच त्यांचे एजंट साथीदारांच्या साहाय्याने ग्राहकांना मुलींचे फोटो पाठवून वेश्या गमनसाठी रक्कम ठरवून ग्राहकांना मुली ठेवलेल्या ठिकाणी वेश्या गमनासाठी पाठवितात अथवा ग्राहकांच्या मागणीनुसार संबंधित ठिकाणी पाठवितात व ते वेश्या गमनाकरिता आलेल्या ग्राहकाकडून ३ हजार रू. नमूद मुली मार्फत अथवा त्याचे साथीदारांकडून वेश्या गमनाचे पैसे स्विकारतात. त्यातून स्वतःसाठी व साथीदार एजंटासाठी ठराविक हिस्सा काढून घेवून त्यावर स्वतःची व साथीदारांची उपजीविका भागवितात. ते कोरेगाव पार्क भागात ग्राहकांच्या मागणीनुसार वेगवेगळ्या ठिकाणी मुली पुरवून वेश्या व्यवसाय चालवित आहे, अशी बातमी मिळाल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. मदन बहाद्दरपुरे, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे यांनी पोलीस स्टेशन कडील अधिकारी, स्टाफ व पंचासह गंधर्व रेसीडेन्सी, लेन नं.सी, कोरेगाव पार्क, पुणे येथे जावून छापा घातला असता छाप्यामध्ये मूळची झारखंड राज्यातील पीडित मुलगी मिळून आली. सदर मुलीकडून एजंट नामे- (१) समीरा, (२) हैदर खान, (३) करण, (४) अमर व (५) अजय हे वेश्या व्यवसाय चालवत असल्याचे समजले असून, सदर मुलीस पैशाचे आमिष दाखवून, तिचेकरवी वेश्या व्यवसाय करून घेत आहेत, असे तपासात निष्पन्न झाल्याने, वर नमूद एजंटांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व नमूद पीडित मुलीची वेश्या व्यवसायातून सुटका करण्यात आलेली आहे व तिस शासकीय महिला राज्यगृह, मुंढवा, पुणे येथे संरक्षणकामी ठेवण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, मा.श्रीमती डॉ. प्रिती टिपरे, सहा.पोलीस आयुक्त सो., लष्कर विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे, श्रीमती मनिषा टुले, पोलीस उप निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे व पोलीस कर्मचारी दिनेश शिंदे, रियाज शेख, दशरथ सावंत व महिला पोलीस कर्मचारी सोनाली कुंभार, ज्योती राऊत यांनी केलेली आहे.

(signature)
(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे